दैनिक दिव्य मराठी दिव्य सिटी
# अहिल्यानगर
अहिल्यानगर. शुक्रवार, १ नोव्हेंबर २०२४





सांस्कृतिक • हातवळण देवीचे येथील शिंदे बंधूंना 'रंगला हरिरंग' कार्यक्रमात सादरीकरणाची संधी

# अमेरिकेत रंगला पारंपरिक देवीचा गोंधळ

**प्रतिनिधी** | अहिल्यानगर

शहरातील गोंधळी कलाकार पांडुरंग शिंदे व हरिदास शिंदे या बंधूंना अमेरिकेतील न्यू जर्सी, फिलाडेल्फिया, इडिसन, ऑस्टीन, न्यूर्याक व बोस्टन या शहरात प्रथमच पारंपरिक देवीचा गोंधळ सादर करण्याची संधी मिळाली. विशेष म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या न्यूयॉर्कमधील स्वागत समारंभप्रसंगी जागरण गोंधळ सादर करता आला. शिंदे बंधू हे अहिल्यानगरमधील हातवळण देवीचे येथील रहिवाशी आहेत. सप्टेंबरमध्ये पंतप्रधान मोदी अमेरिका दौऱ्यावर असताना भारतीयांनी आयोजित केलेल्या स्वागत समारंभात 'रंगला हरिरंग' या कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्राचे लोकसंगीत असलेल्या पारंपरिक गोंधळ जागरणाचा कार्यक्रम सादर केला.




अमेरिकेतील 'रंगला हरिरंग' कार्यक्रमात देवीचा गोंधळ सादर करताना शिंदे बंधू.

### शाहिर अज्ञानदासांचे १७वे वंशज

छत्रपती शिवाजी महाराजांनी अफझल खानाचा वध केला, त्या वधाचा पोवाडा लिहून तो प्रत्यक्ष जिजाऊ आणि छत्रपतींनाच ऐकवला, ती व्यक्ती होती गोंधळी शाहीर अज्ञानदास. त्या अज्ञानदासजींचे १७वे वंशज म्हण शिंदे बंधू. शेकडो वर्षांपासून घराण्याची परंपरा आजही ते जपत आहेत.

शिंदे यांनी साता समुद्रापार अमेरिकेतील जमिनीवर अनेक वर्षांनंतर पहिला पारंपरिक गोंधळ जागरण कार्यक्रम केला. पांडुरंग शिंदे, हरिदास शिंदे व रामजी पांढरे या तिघा कलावंतानी अमेरिकेतील भारतीयांच्या निमंत्रणावरून हरिरंग कॉन्सर्टच्या माध्यमातून 'रंगला हरिरंग' या कार्यक्रमांतर्गत सप्टेंबर महिन्यात अमेरिकेतील वेगवेगळ्या शहरांत पारंपरिक गोंधळी कला सादर करण्याची संधी लाभली. अज्ञानदासजीचे वंशज शिंदे बंधूंना हा विलक्षण योगायोग म्हणवून घेण्यात शिंदे बंधूंनी धन्यता न मानता पूर्ण वेळ कलेला वाहून घेतले आहे. त्यांनी महाराष्ट्राच्या लोकसंगीत व लोकसंस्कृतीच्या विकासासाठी लोकसंस्कृती कला सेवा संघाची स्थापना व २०१७ मध्ये भारतातील पहिल्या रणधुमाळी संबळ पथकाची निर्मिती केली. त्याचबरोबर २५०० हून अधिक लोकसंगीताचे कार्यक्रम केले आहेत. तसेच 'वारसा महाराष्ट्राचा' अंतर्गत प्रयोग केले. हरिदास शिंदे यांना लोकमान्य टिळक पुरस्कार, अण्णा भाऊ साठे पुरस्कार, २०१२ स्वामी विवेकानंद पुरस्कार, २०१७ अनन्य सन्मान पुरस्कार, २०१९ सरगम सन्मान या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आल्याचे लोकसंस्कृती कलासेवा संघाचे सहसचिव संजय कुलकर्णी यांनी सांगितले. हरिदास शिंदे यांनी प्रामुख्याने फत्ते शिकस्त, पावनखिंड, हंबीरराव, आनंदी गोपाळ, एक होतं माळीण या चित्रपटांसह अनेक टीव्ही मालिकांत पार्श्वगायन, तसेच पारंपरिक वाद्यांचे सादरीकरण केले.

लोकमत

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमोर अमेरिकेत जागरण गोंधळ

## हातवळणच्या शिंदे बंधूंना संधी : महाराष्ट्राची कला सातासमुद्रापार

लोकमत न्यूज नेटवर्क

**अहिल्यानगर :** येथील गोंधळी कलाकार पांडुरंग शिंदे व हरिदास शिंदे या बंधूंना अमेरिकेतील न्यू जर्सी, फिलाडेल्फिया, इडिसन, ऑस्टीन, न्यूयॉर्क व बोस्टन या शहरात प्रथमच पारंपरिक देवीचा गोंधळ सादर करण्याचे भाग्य लाभले. विशेष म्हणजे भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या न्यूयॉर्कमधील स्वागत समारंभाप्रसंगी जागरण गोंधळ सादर करण्याची संधी शिंदे बंधूंना मिळाली.




कलाकार पांडुरंग शिंदे व हरिदास शिंदे या बंधूंना अमेरिकेत पारंपरिक देवीचा गोंधळ सादर करण्याची संधी मिळाली.

शिंदे बंधू हे अहिल्यानगरमधील हातवळण देवीचे येथील आहेत. सप्टेंबरमध्ये पंतप्रधान मोदी अमेरिका दौऱ्यावर असताना भारतीयांनी आयोजित केलेल्या स्वागत समारंभात 'रंगला हरिरंग' या कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्राचे लोकसंगीत असलेल्या पारंपरिक गोंधळ जागरणाचा कार्यक्रम सादर केला.

शिंदे यांनी साता समुद्रापार अमेरिकेतील जमिनीवर अनेक वर्षांनंतर पहिला पारंपरिक गोंधळ जागरण कार्यक्रम केला. शेकडो वर्षांपासून घराण्याची परंपरा शिंदे आजही जपत आहेत.

पांडुरंग शिंदे, हरिदास शिंदे व रामजी पांढरे या तिघा कलावंतांना अमेरिकेतील भारतीयांच्या निमंत्रणावरून हरिरंग कॉन्सर्टच्या माध्यमातून 'रंगला हरिरंग' या कार्यक्रमांतर्गत सप्टेंबर महिन्यात अमेरिकेतील शहरांत पारंपरिक गोंधळी कला सादर करण्याची संधी लाभली. त्यांनी महाराष्ट्राच्या लोकसंगीत व लोकसंस्कृतीच्या विकासासाठी लोकसंस्कृती कला सेवा संघाची स्थापना करून २०१७ मध्ये भारतातील पहिल्या रणधुमाळी संबळ पथकाची निर्मिती केली. त्याचबरोबर २५०० हून अधिक लोकसंगीत कार्यक्रम केले.

सकाळ

# अमेरिकेत रंगला पारंपरिक जागरण गोंधळ

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची उपस्थिती : नगरच्या शिंदे बंधूंना सादरीकरणाची संधी

**अहिल्यानगर, ता. ३१ :** महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेतील जागरण गोंधळाला विशेष महत्त्व आहे. त्याला आध्यात्मिक आधार, तर आहेच, शिवाय एक कला म्हणून त्याकडे पाहिले जाते. नुकताच अमेरिकेत एका उपक्रमादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत जागरण गोंधळ झाला. अहिल्यानगर जिल्ह्यातील गोंधळी कलाकार पांडुरंग शिंदे व हरिदास शिंदे या बंधूंना ही संधी मिळाली.

अमेरिकेतील न्यू जर्सी, फिलाडेल्फिया, इडिसन, ऑस्टीन, न्यूर्याक व बोस्टन या शहरात प्रथमच पारंपरिक देवीचा गोंधळ सादर करण्यात आला. शिंदे बंधू हे अहिल्यानगरमधील हातवळण देवीचे येथील आहेत. सप्टेंबरमध्ये पंतप्रधान मोदी अमेरिका दौऱ्यावर असताना भारतीयांनी आयोजित




**अमेरिका :** येथे जागरण गोंधळ सादर करताना हातवळण (ता. अहिल्यानगर) येथील शिंदे बंधू.

केलेल्या स्वागत समारंभात 'रंगला हरिरंग'' या कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्राचे लोकसंगीत असलेल्या पारंपरिक गोंधळ जागरणाचा कार्यक्रम सादर केला.

शिंदे यांनी साता समुद्रापार अमेरिकेतील जमिनीवर अनेक वर्षांनंतर पहिला पारंपरिक गोंधळ जागरण कार्यक्रम केला. छत्रपती शिवाजी महाराजांनी अफझल खानाचा वध केला, त्या वधाचा पोवाडा लिहून तो प्रत्यक्ष जिजाऊ आणि छत्रपतींनाच ऐकवला ती व्यक्ती होती गोंधळी शाहीर अज्ञानदास. त्या अज्ञानदासजींचे १७ वे वंशज नगरचे शिंदे बंधू. शेकडो वर्षांपासून घराण्याची परंपरा आजही जपत आहेत.

पांडुरंग शिंदे, हरिदास शिंदे व रामजी पांढरे या तिघा कलावंतांनी अमेरिकेतील भारतीयांच्या निमंत्रणावरून हरिरंग कॉन्सर्टच्या माध्यमातून 'रंगला हरिरंग'' या कार्यक्रमांतर्गत सप्टेंबर महिन्यात अमेरिकेतील वरील शहरांत पारंपरिक गोंधळी कला सादर करण्याची संधी लाभली. अज्ञानदासजींचे वंशज शिंदे बंधूंना हा विलक्षण योगायोग म्हणवून घेण्यात शिंदे बंधुंनी धन्यता न मानता पूर्णवेळ कलेला वाहून घेतले आहे.

### अनेक पुरस्कारांचे धनी

शिंदे बंधुंनी महाराष्ट्राच्या लोकसंगीत व लोकसंस्कृतीच्या विकासासाठी लोकसंस्कृती कला सेवा संघाची स्थापना व २०१७ मध्ये भारतातील पहिल्या 'रणधुमाळी संबळ पथकाची निर्मिती'' केली. त्याचबरोबर अडीच हजारांहून अधिक लोकसंगीत कार्यक्रम केले. 'वारसा महाराष्ट्राचा'' अंतर्गत प्रयोग केले. हरिदास शिंदे यांना लोकमान्य टिळक पुरस्कार, अण्णा भाऊ साठे पुरस्कार, २०१२ स्वामी विवेकानंद पुरस्कार, २०१७ अनन्य सन्मान पुरस्कार, २०१९ सरगम सन्मान या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आल्याचे लोकसंस्कृती कला सेवा संघाचे सहसचिव संजय कुलकर्णी यांनी सांगितले.



" महाराष्ट्रातील लोककलेचा डंका जगभर आहे. जागरण गोंधळ सारख्या कलेची जपवणूक केली पाहिजे. त्या माध्यमातून लोकप्रबोधन केले जाते. शिंदे बंधुंनी या कलेसाठी दिलेले योगदान मोलाचे आहे.

**- प्रशांत नेटके,** अध्यक्ष, चित्रपट व लोककलावंत संघर्ष समिती, महाराष्ट्र

सकाळ

सकाळ

# परदेशातही सादर झाला जागरण-गोंधळ

डॉ. सुदाम बिडकर (पत्रकार)

**पारगाव, ता. १९ :** साता समुद्रापार अमेरिकेतील अनेक वर्षांनंतर भारताची लोककला असलेला जागरण-गोंधळ सादर करण्यात आला. ही कला नगर जिल्ह्यातील हातवळण देवी गावचे सुपुत्र पांडुरंग, हरिदास शिंदे या भावांना नुकत्याच झालेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमेरिका दौऱ्यात न्यूयॉर्कमध्ये सादर करण्याची संधी मिळाली.

यावेळी त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी अफझल खानाच्या केलेल्या वधावर आधारित पोवाडा सादर केला. शिंदे बंधूंसमवेत रामजी पांढरे यांनाही आपली कला सादर करण्याची संधी मिळाली. यावेळी त्यांनी अमेरिकेतील न्यू जर्सी, फिलाडेल्फिया, इडीसन, ऑस्टिन, न्यूयॉर्क, बोस्टन या शहरात गोंधळ सादर केला.



फिलाडेल्फिया (अमेरिका) : कार्यक्रमप्रसंगी पांडुरंग शिंदे, हरिदास शिंदे, रामजी पांढरे यांच्यासह साथीदार कलाकार.

हरिदास शिंदे यांनी आत्तापर्यंत फत्ते शिकस्त, पावनखिंड, हंबीरराव, आनंदी गोपाळ, एक होतं माळीण या चित्रपटांसह अनेक टीव्ही मालिकांमध्ये पार्श्वगायन, पारंपरिक वाद्यांचे सादरीकरण केले.

हरिदास शिंदे यांनी महाराष्ट्राच्या लोकसंगीत तसेच लोकसंस्कृतीच्या विकासासाठी लोकसंस्कृती कला सेवा संघाची स्थापना केली असून २०१७ मध्ये रणधुमाळी संबळ पथकाची निर्मिती केली आहे. त्याचबरोबर २५०० हून अधिक लोकसंगीत कार्यक्रम केले आहेत. हरिदास शिंदे यांना लोकमान्य टिळक पुरस्कार, अण्णा भाऊ साठे पुरस्कार, २०१२ स्वामी विवेकानंद पुरस्कार, २०१७ अनन्य सन्मान पुरस्कार, २०१९ सरगम या पुरस्कारांनी सन्मानित केले आहे.

Pune, District-Today
20/10/2024 Page No. 8

डॉ. सुदाम बिडकर (पत्रकार)

साम | सकाळ | सरकारनामा | अॅग्रोवन | गोमन्तक | 9975599690

संपादक – शिवाजी शिर्के

नगर सह्याद्री

# अमेरिकेत रंगला हरिरंग व पारंपरिक गोंधळ

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत अमेरिकेत गोंधळ जागरणाची कला सादर करण्याची शिंदे बंधूंना संधी

अहिल्यानगर । नगर सह्याद्री

येथील पांडुरंग शिंदे व हरिदास शिंदे या बंधूंना अमेरिकेतील न्यू जर्सी, फिलाडेल्फिया, इडिसन, ऑस्टीन, न्यूर्याकॅ व बोस्टन या शहरांत प्रथमच पारंपरिक देवीचा गोंधळ सादर करण्याचे भाग्य लाभले. विशेष म्हणजे भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या न्यूयॉर्कमधील स्वागत समारंभाप्रसंगी कला सादर करण्याची संधी शिंदे बंधूंना मिळाली.

श्री. शिंदे यांनी साता समुद्रापार अमेरिकेतील जमिनीवर अनेक वर्षानंतर पहिला पारंपरिक गोंधळ जागरण कार्यक्रम केला. शिंदे बंधू हे अहिल्यानगरमधील हातवळण देवीचे येथील आहेत. सप्टेंबरमध्ये श्री. मोदी अमेरिका दौऱ्यावर असताना भारतीयांनी आयोजित केलेल्या स्वागत समारंभात महाराष्ट्राचे लोकसंगीत असलेल्या पारंपारिक




गोंधळ जागरणाचा कार्यक्रम सादर केला. छत्रपती शिवाजी महाराजांनी अफझल खानाचा वध केला. त्या वधाचा पोवाडा लिहून तो प्रत्यक्ष जिजाऊ आणि छत्रपतींनाच ऐकवला ती व्यक्ती होती गोंधळी शाहीर अज्ञानदास.

त्या अज्ञानदासजींचे १७ वे वंशज म्हणजेच शिंदे बंधू. या दोघांच्या सोबतीला होते रामजी पांढरे. या तिघा कलावंतानी अमेरिकेतील भारतीयांच्या निमंत्रणावरून हरिरंग कॉन्सर्टच्या माध्यमातून रंगला हरिरंग' या कार्यक्रमांतर्गत सप्टेंबर महिन्यात अमेरिकेतील वरील शहरांत पारंपरिक गोंधळी कला सादर करण्याची संधी लाभली. अज्ञानदासजीचे वंशज शिंदे बंधूंना हा विलक्षण योगायोग म्हणवून घेण्यात शिंदे बंधूंनी धन्यता न मानता पूर्णवेळ कलेला वाहून घेतले आहे.

त्यांनी महाराष्ट्राच्या लोकसंगीत व लोकसंस्कृतीच्या विकासासाठी लोकसंस्कृती कला सेवा संघाची स्थापना व २०१७ मध्ये भारतातील पहिल्या रणधुमाळी संबळ पथकाची निर्मिती' केली. त्याचबरोबर २५००हून अधिक लोकसंगीत कार्यक्रम केले. वारसा महाराष्ट्राचा' अंतर्गत प्रयोग केले. हरिदास शिंदे यांना लोकमान्य टिळक पुरस्कार, अण्णाभाऊ साठे पुरस्कार, २०१२ स्वामी विवेकानंद पुरस्कार, २०१७ अनन्य सन्मान पुरस्कार, २०१९ सरगम सन्मान या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आल्याचे लोकसंस्कृती कला सेवा संघाचे सहसचिव संजय कुलकर्णी यांनी सांगितले. हरिदास शिंदे यांनी प्रामुख्याने फत्ते शिकस्त, पावनखिंड, हंबीरराव, आनंदी गोपाळ, एक होतं माळीण या चित्रपटांसह अनेक टीव्ही मालिकांत पार्श्वगायन, तसेच पारंपरिक वाद्यांचे सादरीकरण केले आहे.

नवा मराठा
संस्थापक के. आचार्य गुंदेचा
संपादक : सुभाष गुंदेचा — कार्य. संपादक : ॲड. ललित गुंदेचा
epaper.enavamaratha.com
24 Oct 2024 - Page 4

# अमेरिकेत रंगला हरीरंग व पारंपरिक गोंधळ

नगर – येथील पांडुरंग शिंदे व हरिदास शिंदे या बंधूंना अमेरिकेतील न्यू जर्सी, फिलाडेल्फिया, इडिसन, ऑस्टीन, न्यूर्याकॅ व बोस्टन या शहरांत प्रथमच पारंपरिक देवीचा गोंधळ सादर करण्याचे भाग्य लाभले. विशेष म्हणजे भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या न्यूयॉर्कमधील स्वागत समारंभाप्रसंगी कला सादर करण्याची संधी शिंदे बंधूंना मिळाली.







पांडुरंग शिंदे, हरिदास शिंदे व रामजी पांढरे अमेरिकेत देवीचा गोंधळ सादर करताना. दुसऱ्या छायाचित्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या न्यूयॉर्कमधील स्वागत समारंभ प्रसंगी कला सादर करताना तिनही कलाकार.

श्री. शिंदे यांनी साता समुद्रापार अमेरिकेतील जमिनीवर अनेक वर्षांनंतर पहिला पारंपरिक गोंधळ जागरण कार्यक्रम केला. शिंदे बंधू हे अहिल्यानगरमधील हातवळण देवीचे येथील आहेत. सप्टेंबरमध्ये श्री. मोदी अमेरिका दौऱ्यावर असताना भारतीयांनी आयोजित केलेल्या स्वागत समारंभात महाराष्ट्राचे लोकसंगीत असलेल्या पारंपारिक गोंधळ जागरणाचा कार्यक्रम सादर केला.

छत्रपती शिवाजी महाराजांनी अफझल खानाचा वध केला, त्या वधाचा पोवाडा लिहून तो प्रत्यक्ष जिजाऊ आणि छत्रपतींनाच ऐकवला ती व्यक्ती होती गोंधळी शाहीर अज्ञानदास. त्या अज्ञानदासजींचे १७ वे वंशज म्हणजेच शिंदे बंधू.

या दोघांच्या सोबतीला होते रामजी पांढरे. या तिघा कलावंतानी अमेरिकेतील भारतीयांच्या निमंत्रणावरून हरिरंग कॉन्सर्टच्या माध्यमातून 'रंगला हरिरंग' या कार्यक्रमांतर्गत सप्टेंबर महिन्यात अमेरिकेतील वरील शहरांत पारंपरिक गोंधळी कला सादर करण्याची संधी लाभली. अज्ञानदासजीचे वंशज शिंदे बंधूंना हा विलक्षण योगायोग म्हणवून घेण्यात शिंदे बंधूंनी धन्यता न मानता पूर्णवेळ कलेला वाहून घेतले आहे.

त्यांनी महाराष्ट्राच्या लोकसंगीत व लोकसंस्कृतीच्या विकासासाठी लोकसंस्कृती कला सेवा संघाची स्थापना व २०१७ मध्ये भारतातील पहिल्या 'रणधुमाळी संबळ पथकाची निर्मिती' केली. त्याचबरोबर २५००हून अधिक लोकसंगीत कार्यक्रम केले.'वारसा महाराष्ट्राचा' अंतर्गत प्रयोग केले.

हरिदास शिंदे यांना लोकमान्य टिळक पुरस्कार, अण्णाभाऊ साठे पुरस्कार, २०१२ स्वामी विवेकानंद पुरस्कार, २०१७ अनन्य सन्मान पुरस्कार, २०१९ सरगम सन्मान या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आल्याचे लोकसंस्कृती कला सेवा संघाचे सहसचिव संजय कुलकर्णी यांनी सांगितले. हरिदास शिंदे यांनी प्रामुख्याने फत्ते शिकस्त, पावनखिंड, हंबीरराव, आनंदी गोपाळ, एक होतं माळीण या चित्रपटांसह अनेक टीव्ही मालिकांत पार्श्वगायन, तसेच पारंपरिक वाद्यांचे सादरीकरण केले.

समाचार

# नगरच्या शिंदे बंधूंचा अमेरिकेत रंगला पारंपरिक गोंधळ कार्यक्रम



**समाचार/नगर-दि.२४**

येथील पांडुरंग शिंदे व हरिदास शिंदे या बंधूंना अमेरिकेतील न्यू जर्सी, फिलाडेल्फिया, इडिसन, ऑस्टीन, न्यूर्याकॅ व बोस्टन या शहरांत प्रथमच पारंपरिक देवीचा गोंधळ सादर करण्याचे भाग्य लाभले. विशेष म्हणजे भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या न्यूयॉर्कमधील स्वागत समारंभाप्रसंगी कला सादर करण्याची संधी शिंदे बंधूंना मिळाली.

शिंदे यांनी साता समुद्रापार अमेरिकेतील जमिनीवर अनेक वर्षांनंतर पहिला पारंपरिक गोंधळ जागरण कार्यक्रम केला. शिंदे बंधू हे नगरमधील हातवळण देवीचे येथील आहेत. सप्टेंबरमध्ये पंतप्रधान मोदी अमेरिका दौऱ्यावर असताना भारतीयांनी आयोजित केलेल्या स्वागत समारंभात महाराष्ट्राचे लोकसंगीत असलेल्या पारंपारिक गोंधळ जागरणाचा कार्यक्रम सादर केला. छत्रपती शिवाजी महाराजांनी अफझल खानाचा वध केला, त्या वधाचा पोवाडा लिहून तो प्रत्यक्ष जिजाऊ आणि छत्रपतींनाच ऐकवला ती व्यक्ती होती गोंधळी शाहीर अज्ञानदास.

त्या अज्ञानदासांचे १७ वे वंशज म्हणजेच शिंदे बंधू. या दोघांच्या सोबतीला होते रामजी पांढरे. या तिघा कलावंतानी अमेरिकेतील भारतीयांच्या निमंत्रणावरून हरिरंग कॉन्सर्टच्या माध्यमातून रंगला हरिरंग' या कार्यक्रमांतर्गत सप्टेंबर महिन्यात अमेरिकेतील वरील शहरांत पारंपरिक गोंधळी कला सादर करण्याची संधी लाभली. अज्ञानदासांचे वंशज शिंदे बंधूंना हा विलक्षण योगायोग म्हणवून घेण्यात शिंदे बंधूंनी धन्यता न मानता पूर्णवेळ कलेला वाहून घेतले आहे.

त्यांनी महाराष्ट्राच्या लोकसंगीत व लोकसंस्कृतीच्या विकासासाठी लोकसंस्कृती कला सेवा संघाची स्थापना व २०१%मध्ये भारतातील पहिल्या रणधुमाळी संबळ पथकाची निर्मिती' केली. त्याचबरोबर २५००हून अधिक लोकसंगीत कार्यक्रम केले.वारसा महाराष्ट्राचा' अंतर्गत प्रयोग केले. हरिदास शिंदे यांना लोकमान्य टिळक पुरस्कार, अण्णाभाऊ साठे पुरस्कार, २०१२ स्वामी विवेकानंद पुरस्कार, २०१% अनन्य सन्मान पुरस्कार, २०१९ सरगम सन्मान या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आल्याचे लोकसंस्कृती कला सेवा संघाचे सहसचिव संजय कुलकर्णी यांनी सांगितले. हरिदास शिंदे यांनी प्रामुख्याने फत्ते शिकस्त, पावनखिंड , हंबीरराव, आनंदी गोपाळ, एक होतं माळीण या चित्रपटांसह अनेक टीव्ही मालिकांत पार्श्वगायन, तसेच पारंपरिक वाद्यांचे सादरीकरण केले.